# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक गा–हाणे निवारण मंच
# नागपूर शहर परिमंडळ, नागपूर.

---

## प्रकरण कं. ग्रागानिमं/नाशप/०४३ /२०१०

अर्जदार : श्री नारायण तुकाराम तडसे
राहणार प्लॉट नं. ४७२, ओंकार नगर
शिवनगर चौक,
नागपूर.

– विरूध्द –

गैरअर्जदार : कार्यकारी अभियंता,
महाल विभाग, नाशप,
म.रा.वि.वितरण कंपनी मर्या,
नागपूर.

गणपूर्ती : 1) श्रीमती मीरा खडक्कार
सभापती,
ग्राहक गा–हाणे निवारण मंच
नाशप, नागपूर.

2) श्रीमती के.के घरत
सदस्य–सचिव,
ग्राहक गा–हाणे निवारण मंच
नाशप, नागपूर.

3) श्रीमती गौरी चांद्रायण,
सदस्या
ग्राहक गा–हाणे निवारण मंच,
नाशप, नागपूर.

— आदेश ——

पारीत दि. २८.०७.२०१०

ग्राहक गा–हाणे निवारण मंचात अर्जदार यांनी तक्रार अर्ज दिनांक ११.०६.२०१० रोजी म.राज्य विज नियामक आयोग (ग्रागानिम व विद्युत लोकपाल) विनियम ६.४ विनियम २००६ प्रमाणे दाखल केलेला आहे.

अर्जदाराचा गा–हाण्याचा तपशील :–

१. श्री नारायण तुकाराम तडसे रा. ओंकार नगर यांनी गैरअर्जदारास मीटर नोंदीप्रमाणे विद्युत देयक येण्याबाबत वारवांर पत्र व्यवहार केले परंतु गैरअर्जदारातर्फे या तक्रारीची कुठलीही दखल घेण्यात आली नाही, तेव्हा दिनांक ११.०६.२०१० रोजी अर्जदार यांनी मंचात गा–हाणे दाखल केले व विनंती केली की,

अ) मीटर नोंदी नुसार नियमीत बिल देण्यात यावे.

२. अर्जदार यांनी मंचात दाखल केलेल्या अर्जात असे नमुद केले आहे की त्यांच्या वडीलांचे नावे दोन मीटर होते, अनुक्रमे 1. ९०१०२११००२, 2. ९१००७४८०४६ तसेच त्यांचा ग्राहक कं. ४१००११४५३६९८ हा आहे, जेव्हा फोटो बिलींग सुरू झाले तेव्हा गैअर्जदारातर्फे मीटर कं. ९०१०२११००२ असलेले मीटर दिनांक १९.१२.२००८ रोजी काढुन नेण्यात आले. तेव्हा पासुन पत्र व्यवहार केल्यानंतरही सरासरी वापराचे ५१ युनिट असलेले विद्युत देयक देण्यात येत आहे.

३. अर्जदाराने पूढे असेही नमुद केले की मार्च २०१० मध्ये त्यांना ९०५७ युनिट असलेले रूपये ५३,१२०/– रकमेचे विद्युत देयक देण्यांत आले. त्यामध्ये मागील रिडींग शुन्य दाखविले होते. त्यानंतर गैरअर्जदारांनी ते विद्युत देयक परत घेतले, परंतु अध्यापही मीटर नोंदी घेवूनही विद्युत देयक दिले गेले नाहीत. अर्जदाराने आपल्या अर्जात विनंती केली की दिनांक ११.०६.२०१० रोजी असलेले मीटर रिडींग ९७२१ तसेच मागील रिडींग दि. १४.०६.२००८ च्या विद्युत देयकात असलेल्या मीटर चे वाचन ६००२ व आतापर्यंत सरासरी युनिट ९५६ वजा करून उर्वरीत २७६३ युनिटचे विद्युत देयके देण्यात यावे. तसेच त्यावेळेस असलेले दर लावून स्लॅब बेनिफीट देण्यातं यावा.

४. गैरअर्जदारातर्फे उपकार्यकारी अभियंता, उपविभाग नंदनवन यांनी आपले स्पष्टीकरण २५.०६.२०१० रोजी मंचात सादर केले. त्यामध्ये असे नमुद केले आहे की, अर्जदाराचे मीटर ज्याचे क्रं. ९०१०२११००२ असे होते ते दिनांक १९.१२.२००८ रोजी ९४८८ या नोंदीवर काढण्यात आले. परंतु सी.पी.एल. नुसार विद्युत देयक हे ९४८४ पर्यंत देण्यात आले होते. तेव्हा उर्वरीत ४ युनिट अर्जदारास आकारणे देय करीता शिल्लक आहे. तसेच अर्जदाराचे दुसरे मीटर ज्याचे क्रं. ९१००१४८०४६ इतके आहे त्यामध्ये ६००२ ते ९८२१ या नोंदी पर्यंत एकुण ३६१९ युनिटचे वापर झालेले आहे. तसेच काढलेले मीटरचे ४ युनिट जोडुन एकुण वापर ३७२३ इतका होतो. हा वापर नोव्हेंबर २००८ ते जुन २०१० पर्यंत झालेला आहे. परंतु या काळात अर्जदाराला सरासरी वापराचे ५१ युनिट असलेले एकुण १०९३ युनिटचे विद्युत देयक देण्यात आले आहेत.

५. गैरअर्जदारातर्फे पुढे असेही नमुद केले आहे की अर्जदाराच्या तक्रारीनुसार एकुण वापरलेले युनिट मधुन, सरासरी एकुण युनिट १०९३ वजा करण्यात आले व उर्वरीत २६३० युनिट ला १९ महिन्यात विभागीत करून रूपये १०४५०/– अशी रक्कम असलेले विद्युत देयक अर्जदारास देण्यात आले आहेत.

६. दिनांक ०५.०७.२०१० रोजी मंचात सुनावणी घेण्यात आली. दोन्ही पक्ष उपस्थित होते. गैरअर्जदारातर्फे श्री श्रीवास्तव, उपकार्यकारी अभियंता, नदंनवन उपविभाग हे उपस्थित होते. श्री सुधाकर तडसे यांनी अर्जदाराची बाजु माडंताना सांगितले की गैरअर्जदारातर्फे देण्यात आलेले सुधारीत देयक त्यांना मान्य नाही, कारण ६००२ असे वाचन मीटरवर नोंदवलेले जुलै २००८ च्या विद्युत देयकात दर्शविले होते, तेंव्हा देयक जुलै २००८ पासुन तयार करण्यात यावे. यावर

गैरअर्जदाराने आपली मान्यता दर्शविली व दोन्ही पक्ष विचार विनिमय करून, तडजोड करण्यास तयार झाले.

७. दिनांक ०५.०७.२०१० रोजी संयुक्तपणे तडजोड करून दाखल केलेल्या अर्जानुसार गैरअर्जदार हे माहे जुलै २००८ पासुन जुन २०१० पर्यंत एकुण २३ महिन्याचे मीटर नोंदी नुसार देयक दुरूस्त करण्यास तयार आहेत तसेच अर्जदारातर्फे दिलेले युनिट ९९३० दिनांक ०४.०७.२०१० हे ग्राहय धरून त्यामधुन सरासरी युनिट ९९३ वजा करून सुधारीत देयक देण्याचे नमुद केले आहे. यापुढे सर्व विद्युत देयक मीटर नोंदीप्रमाणे होईल व सुधारीत देयक भरणा करीता अर्जदारास स्लॅब बेनिफिट देवून चार हप्त्यांची सवलत देण्यात येईल, या संयुक्त अर्जावर अर्जदाराने आपली मान्यता दर्शविली आहे व सुधारीत देयक व्याज न लावता चार हप्त्यांत भरण्याची विनंती केली आहे.

दोन्ही पक्षकारांची विनंती विचारात घेवून खालील आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. संयुक्तपणे तडजोड करून सादर केलेल्या अर्जाची काटेकोर अंमल बजावणी करण्यात यावी.

२. गैरअर्जदारास आदेश देण्यांत येतो की आदेशाची प्रत मिळाल्यापासुन एक महीन्याचे आत कार्यवाहीबदद्लचा अहवाल या कार्यालयांत पाठविण्यात यावा.

| | | |
|---|---|---|
| सही/– | सही/– | सही/– |
| (श्रीमती के.के. घरत) | (श्रीमती गौरी चांद्रायण) | (श्रीमती मीरा खडक्कार) |
| सदस्य – सचिव | सदस्या् | सभापती |